महाराष्ट्र शासन

# शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय,चंद्रपूर

# Government Medical College & Hospital, Chandrapur

Govt. T.B. Hospital Campus, Ramnagar, Chandrapur - 442401, M.S. (INDIA)

Telephone No:- 07172- 277103, 277106, 252522 Fax No:- 07172- 277104

Website : www. gmcchandrapur.org Email – gmcchandrapur@gmail.com

No.GMCC/Central Store/ Mess & Canteen/ 8403 /16. Dt.31/08/2016

## खानावळ व उपहारगृह करीता
## खुले दरपत्रके

शासकीय वैद्यकिय महाविद्यालय, चंद्रपूर येथील प्रवेशित विद्यार्थ्यांकरीता महाविद्यालयाच्या परिसरामध्ये खानावळ व उपहारगृह सुरु करावयाचे आहेत. त्याकरीता खालील अटिं व शर्तीचे अधिन राहुन इच्छूक असल्यास अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, चंद्रपूर यांचे नावाने आपले दरपत्रके व आवश्यक गुमास्ता परवाना, अन्न व औषध प्रशासन यांचे प्रमाणपत्र, सी.एस.टी., व्हॅट, पॅन कार्ड व वैद्यकीय प्रमाणपत्र इत्यादी कागदपत्रे सिलंबद पाकिटामध्ये दिनांक ०९/०९/२०१६ पुर्वी या कार्यालयास सादर करावे. दरपत्रकातील दर हे प्रति दिवस प्रति विद्यार्थी हया प्रमाणे सर्व करासह नमुद केलेले असावेत.(दरपत्रके दि-१२/०९/१६ रोजी दुपारी ४=०० वाजता उघडण्यात येईल)

- विद्यार्थ्यांना सकाळी ६ ते ९ या दरम्यान नाश्ता व चहा/कॉफी तसेच दुपारचे जेवण १२ ते ०२ या दरम्यान त्याचप्रमाणे संध्याकाळचा चहा ४ ते ६ आणि रात्रीचे जेवण ८ ते १० या काळात देणे बंधनकारक आहे. विद्यार्थ्यांच्या सोईप्रमाणे बदल आवश्यक असल्यास विद्यार्थी प्रतिनिधीच्या सुचनेप्रमाणे त्यावेळेत जेवण पुरवावे लागेल. कोणत्याही परिस्थितीत आपण निर्धारित वेळेत चहा, नाश्ता व जेवण पुरविणे बंधनकारक राहील. अन्नाचा दर्जा उत्तम राहणे गरजेचे आहे, त्याकरीता विद्यार्थी समिती मार्फत अन्नाचा दर्जा वेळोवेळी तपासण्यात येईल. आवठवड्याचा मेनू विद्यार्थी प्रतिनिधीव्दारे ठरविण्यात येईल. दर रविवारला सोडून बाकी सर्व दिवस निश्चित केलेला मेनू देणे बंधनकारक राहील.
- विद्यार्थ्यांना भोजनात वरण, भात, दोन भाज्या, पोळी इत्यादी पदार्थांचा पूरवठा अमर्यादित (पोटभर) करण्यात यावा. जेवणात सलाड आलटून पालटून देण्यात यावे. विद्यार्थ्यांना दररोज सकाळ व संध्याकाळ प्रत्येक वेळी जेवणात लोणचे, लिंबू, पापड व कांदा देणे बंधनकारक राहील.
- स्वयंपाकाची व्यवस्था कॅन्टीन परिसरात करावे लागेल. विद्यूत पूरवठा देयक कंत्राटदराला स्वतः भरावे लागेल. कॅन्टीनचे भाडे बांधकाम विभाग यांनी नियमाप्रमाणे नेमून दिलेल्या दराने भरावे लागेल. स्वयंपाकासाठी व भोजनासाठी लागणारी भांडीकुंडी, खाद्यपदार्थ, आचारी, मदतनीस, वाढणे व सिलेंडर गॅस इत्यादी व्यवस्था कंत्राटदारास स्वतः करावी लागेल. तसेच भांडीकुंडी स्वच्छ ठेवणे व भोजन परिसर स्वच्छ ठेवणे ही जबाबदारी कंत्राटदाराची राहील.
- विद्यार्थ्यांसाठी पिण्याकरीता शुध्द पाण्याची व्यवस्था कंत्राटदराला स्वतः करावी लागेल. विद्यार्थ्यांकडून पैसे वसूल करण्याचे काम हे कंत्राटदाराचे राहील, त्यास महाविद्यालय प्रशासन जबाबदार राहणार नाही. भोजन पुरेसे व उत्तम दर्जाचे असावे. भोजनातील पदार्थ कमी प्रतीचे /भेसळयुक्त निदर्शनास आल्यास अथवा दुषित भोजनामुळे/अस्वच्छतेमुळे भोजन घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या जिवास/ आरोग्यास होणाऱ्या नुकसानीची जबाबदारी कंत्राटधारकाची राहील. अन्न व औषधी प्रशासनाचे धोरणानुसार पुरवठादार कार्यवाहीस पात्र राहील.

अधिष्ठाता
शासकीय वैद्यकिय महाविद्यालय
चंद्रपुर